दैनिक सागर रायगड Raigad
रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबई, प.महाराष्ट्र, सहा स्वतंत्र आवृत्त्या
मंगळवार १४-१-२००३ आरएनआय/११२९०/६५जी.आर./आर.एन.पी./आर.टी.जी१५/२-२००५ ◆ पृष्ठे- ८ सोबत १६ पानी कुटुंब पुरवणी

# चांढवे गावच्या सुपुत्राचा स्पेनमध्ये सन्मान

महाड : स्पेन येथे बेल्जीयम सरकारच्या अकॅडेमी ऑफ इन्फर्मेटायझेशन संस्थकडूने कुवेतचे नामवंत वरिष्ठ विद्युत अभियंता व महाडचे सुपूत्र अब्दुल रझाक रुमानी यांना 'द वर्ल्ड ऑर्डर ऑफ सायन्स एज्युकेशन कल्चर' हा किताब देऊन गौरव करण्यात आला.

दि. ११ नोव्हेंबर २००२ रोजी स्पेन येथे 'ग्रॅन्ड ॲम्पिथिएटर मॅड्रीड कॉलेज ऑफ डॉक्टर्स' या ठिकाणी बेल्जीयम सरकारच्या युरोपीयन अकॅडेमी ऑफ इन्फर्मेटायझेशन संस्था व अल्बर्ट स्वीझर इन्टरनॅशनल युनिव्हर्सिटी लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने 'डिप्लोमॅसी व्हर्सेस टेररिझम' या विषयावर जागतिक परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये 'द वर्ल्ड ऑर्डर ऑफ सायन्स एज्युकेशन कल्चर' हा किताब कुवेत येथील वरिष्ठ विद्युत अभियंता व महाड तालुक्यातील चांढवे गावचे सुपूत्र अब्दुल रझाक रुमानी यांना लंडन डिप्लोमॅटिक अकॅडेमीचे अध्यक्ष प्रो. डॉ. अल्फोन्सो रॉल्डन मूर यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला. यावेळी युरोपीयन अकॅडेमी ऑफ इन्फर्मेटायझेशनचे अध्यक्ष प्रो. डॉ. एडवर्ड एवरीनोव तसेच जगभरातील अन्य मान्यवर उपस्थित होते. महाड तालुक्यातील चांढवे गावासारख्या दुर्गम खेड्यातून कुवेत येथे एका वरिष्ठ पदावर काम करुन 'द वर्ल्ड ऑर्डर ऑफ सायन्स एज्युकेशन कल्चर' हे सन्माननीय पदक आत्मसात केल्याने त्यांचे तालुक्यातून अभिनंदन होत आहे.